(९५)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com

परिपत्रक क्र. १६५

विषय : रु.५० कोटी पेक्षा जास्त किंमत असलेल्या योजनांचा प्रकल्प अहवाल तयार करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत

प्रचलित निकषानुसार नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना तांत्रिक मंजूरी देण्याचा पूर्ण अधिकार मुख्य अभियंता यांना आहे.

रु.५० कोटी वरील योजनांच्या बाबतीत जास्त भांडवली खर्च गुंतणार असल्याने या योजनांच्या बाबतीत, योजना तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम असणे अत्यंत महत्वाचे आहे. योजनेचे किफायतशीर संकल्पन व आखणी तसेच सुयोग्य देखभाल व दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने उद्भवापासून ते वितरण व्यवस्थेपर्यंतच्या सर्व उपांगाची संकल्पने तसेच अंदाजपत्रकांची तपासणी अत्यंत काटेकोरपणे होणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेऊन रु. ५० कोटीवरील सर्व योजनांची अंदाजपत्रके व आराखडे व नकाशा मुख्य अभियंता यांच्या कार्यालयाने मध्यवर्ती संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, ठाणे यांचेकडून तपासून घ्यावेत. मध्यवर्ती संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, ठाणे या कार्यालयाने योजनेची सविस्तर तपासणी करुन योजना तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या योग्य असल्याची खात्री करुन घेऊन तसा सविस्तर प्रस्ताव धारिकेमार्फत मा.सदस्य सचिव यांचेकडे मंजूरीसाठी सादर करावा. मा.सदस्य सचिंव यांच्या मान्यते अंती मुख्य अभियंता यांच्या कार्यालयाने या योजनांना तांत्रिक मंजुरी देऊन, योजना प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्याविषयीची कार्यवाही करावी.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

दिनांक : ३१.०८.२०१५

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५० /९४८

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

- संचालक (तांत्रिक), मजीप्रा, मुंबई
- संचालक (वित्त), मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, मजीप्रा,ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
- अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/ अहमदनगर/ औरंगाबाद/ नांदेड/ लातूर/ अमरावती/ नागपूर/ चंद्रपूर/ अकोला



(कृ.मा.प.)

70

- अधिक्षक अभियंता, म.नि.सं.व सं.कक्ष, मजीप्रा, ठाणे.
- अधिक्षक अभियंता, गु.प.प.कक्ष, मजीप्रा, ठाणे.
  सदर परिपत्रक मजीप्राच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावे.
- कार्यकारी अभियंता (सर्व)